दिनांक 24/06/2024 रोजीचा प्रशासकीय ठराव क्रमांक 07

**विषय** –विटा शहर दुसरी सुधारित विकास योजना मधील जुना गट नंबर 481 नवीन विटा पूर्व 95 व जुना गट नंबर 482 नवीन विटा पूर्व 96 याचा शेती तथा ना विकास झोन मधून रहिवास झोन मध्ये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वये फेर बदल करणे बाबत.

**संदर्भ** -१. श्री दुर्योधन बाळू कदम, श्री सुनील रामचंद्र तारळेकर व श्री कृष्णत बाबुराव मदने यांचा दिनांक 07/03/2024 रोजीचा अर्ज.

२.दिनांक 06/06/2024 ने रचना सहायक, सहायक नगररचनाकार, मुख्याधिकारी यांचे कडील मंजूर टिप्पणी.

विटा शहर मंजूर विकास योजना (दुसरी सुधारित) ही TPS-2009/1138/CR-1964/09/UD-13 दिनांक 31/08/2009 ने मंजूर झाली असून दिनांक 30/10/2009 पासून अमलात आलेली आहे. त्यानुसार जुना गट नंबर 481 व 482/1 (नवीन अनुक्रमे विटा पूर्व 95 व 96/1) हे शेती तथा ना विकास विभागात समाविष्ठ आहेत. सदर क्षेत्राचे झोन बदल करून रहिवासी झोन करून मिळावा याबाबत मागणी अर्ज श्री दुर्योधन बाळू कदम, श्री सुनील रामचंद्र तारळेकर व श्री कृष्णत बाबुराव मदने यांनी दिनांक 07/03/2024 रोजी प्राप्त झाला आहे. दिनांक 06/06/2024 ने रचना सहायक, सहायक नगररचनाकार, मुख्याधिकारी यांचे कडील मंजूर टिप्पणीनुसार सदर क्षेत्र रहिवास झोन मध्ये समाविष्ठ केलेस खालील मुद्यांचा विचार करता योग्य ठरणार आहे.

1. सदर क्षेत्र रहिवास झोन ला लागून आहे व वायव्वेस 24 मी. रुंदीचा प्रस्तावित विटा-लेंगरे डीपी रस्ता आहे, तसेच बोडरे वस्तीकडे जाणार 6 मी. रुंदीचा रस्ता जागेवरती उपलब्ध आहे.
2. वाढत्या लोकसंख्येचा विचार करता सदर क्षेत्र रहिवास झोन मध्ये समाविष्ठ केलेस अस्तित्वातील रहिवास झोन वरील ताण कमी होणार आहे व मालमत्तेच्या किमती स्थिर राहू शकतात.
3. विटा शहरात जास्त प्रमाणात उंच इमारती ऐवजी स्वतंत्र घर बांधणेस लोकांचा कल असलेचे दिसून येते.त्यामुळे अधिकचा रहिवास झोन शहरास आवश्यक आहे त्यामुळे अनाधिकृत बांधकामाला आळा बसण्याची शक्यता नाकारता येत नाही.
4. सदर क्षेत्र रहिवास झोन मध्ये समाविष्ठ केलेस विकास शुल्क व कर संकलनाच्या माध्यमातून नगरपालिकेचे उत्तपन्न वाढ होणार आहे अतिरिक्त महसूलाचा उपयोग सार्वजनिक सेवांसाठी आणि आधारभूत सुविधांच्या सुधारण्यासाठी उपयुक्त ठरू शकतो.
5. सदर क्षेत्रापासून 400 मी अंतरावर नगरपालिकेची पाण्याची टाकी असून तिथून सदर क्षेत्रास पाणी पुरवठा करणे सहज शक्य आहे. तसेच सदर क्षेत्र हे विटा लेंगरे रस्त्यास सन्मुख असून येथे अग्निशमन सुविधा, कचरा संकलनासाठी घंटा गाडी व इतर आरोग्य विषयक सुविधा पुरवणे शक्य आहे.

तरी वरील मुद्द्यांचा विचार करून महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37(1) अन्वये गौणफेरफार करणेस मंजुरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
(डॉ विक्रम बांदल)
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा